# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर

## शिक्षण विभाग

दुरध्वनी क्र. ०७१२-२५६७०२८
EmailID:education.nmc@gmail.com

जा.क्र. 3613/शि.वि./२०१७
दि.23/०१/२०१७

प्रति,

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,
सर्व प्राथ./उच्च प्राथ./माध्य. शाळा,
महानगरपालिका,नागपूर .

**विषय :-** शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षित वाहतुकी संबंधिचा स्कूल बस धोरणानुसार महाराष्ट्र मोटार वाहन (स्कुल बसकरीता विनियम ) नियम - २०११

**संदर्भ :-** दि.२३.०१.२०१७ ला मा.पोलिस आयुक्त यांनी दिलेले सभेतील निर्देश.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, जिल्हा शालेय परिवहन समितीची सभा दि.२३.०१.२०१७ रोजी मा.पोलिस आयुक्त यांचे कार्यालयात संपन्न झाली. या सभेमध्ये मा.आयुक्त यांनी प्रत्येक शाळेमध्ये स्कूल बस परिवहन समिती स्थापन करून त्याची नियमानुसार सभा घ्यावी, असे निर्देश दिले. याकरीता शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षित वाहतूक संबंधीच्या स्कूल बस धोरणात्मक महाराष्ट्र मोटार वाहन (स्कूल बसकरीता विनियम) नियम, २०११ जिल्हा स्कूल बस सुरक्षितता समिती गठीत करण्याकरीता स्कूल बस विनियम , २०११ चे नियम ५ (२) अनुसार शाळेतील मुलांची सुरक्षितपणे ने-आण करणे व इत्यादीबाबत शाळेचे मुख्याध्यापक/प्राचार्य यांच्या अध्यक्षस्थानी समिती गठीत करण्याबाबत आपणांस कार्यालयीन पत्राव्दारे कळविण्यात आले होते. त्यानुसार स्कूल बस समितीची ३ महिन्यातून किमान एकदा बैठक घेणे आवश्यक आहे.

तरी वरीलप्रमाणे चालू सत्रात आपल्या शाळेतील स्कूल बस परिवहन समितीच्या किती सभा घेण्यात आल्या? याबाबतचा अहवाल आपल्या झोनचे शाळा निरीक्षक यांना सात दिवसाचे आंत सादर करावा तसेच विद्यार्थ्यांच्या सुरक्षित ने-आण करण्याबाबत काही अडचण येत असल्यास परिवहन समितीमार्फत ठराव घेवून कार्यालयास सादर करावा.

(फारूक अहमद खान)
शिक्षणाधिकारी,
महानगरपालिका, नागपूर

प्रतिलिपी

१)मा.पोलिस आयुक्त, नागपूर यांना सविनय माहितीस्तव सादर.
२)मा.अपर आयुक्त-१, म.न.पा., नागपूर यांना सविनय माहितीस्तव सादर.
३) मा.उपायुक्त-१, म.न.पा., नागपूर यांना सविनय माहितीस्तव सादर.
४) मा.परिवहन व्यवस्थापक, म.न.पा., नागपूर यांना सविनय माहितीस्तव सादर.
५) शाळा निरीक्षक झोन क्र. १ ते १०, यांना कार्यवाहीस्तव.